# अर्थविज्ञान

## भारताचा आर्थिक इतिहास विशेषांक

आधुनिक भारतीय व्यवसायी वर्गाचे मूलस्रोत–
ध. रा. गाडगीळ, म. बि. नामजोशी

मुगलकालीन अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता–
इरफान हबीब

अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात असेही घडले असेल–
मा. द. आपटे

ऐतिहासिक चौकटीमध्ये आढळून येणारी उद्यमशीलतेची प्रादेशिक प्रतिमाने : १८५७ सालापर्यंतचा पूर्व भारताचा प्रकरणाभ्यास–
अमलेंदु गुह

भारताचा आर्थिक इतिहास (१५२६–१९००) :
[illegible] सूचीविषयक निबंध–

Xm2, N59
155 L1-1
139383

जून १९७१
गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

अर्थविज्ञान

# भारताचा आर्थिक इतिहास विशेषांक

SERVANTS OF INDIA SOCIETY
POONA 4

अर्थविज्ञान

# भारताचा आर्थिक इतिहास

( काही लेख )

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

संपादक व प्रकाशक :
वि. म. दांडेकर
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४

किंमत : पाच रुपये

या विशेषांकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे.

जून १९७१

139383

मुद्रक :
सुजित पटवर्धन
संगम प्रेस लि.,
१७ कोथरूड, पुणे २९

SERVANTS OF INDIA SOCIETY LIBRARY POONA 4

# संपादकीय

'अर्थविज्ञाना'च्या प्रकाशनास मार्च १९५९ मध्ये सुरुवात झाली. त्या वेळी जी अनेक उद्दिष्टे नजरेसमोर ठेवली होती त्यांत लेखकांना इंग्रजीबरोबरच आपापल्या मातृभाषांतून, भारतीय देशी भाषांतूनही अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण करण्यास प्रोत्साहन द्यावे हे एक प्रमुख उद्दिष्ट होते. त्या हेतूने 'अर्थविज्ञाना'च्या प्रत्येक अंकात निदान एक तरी लेख भारतीय देशी भाषेत असावा असे धोरण प्रथमपासूनच ठेवले होते. त्यानुसार मार्च १९६६ पर्यंतच्या सात वर्षांत 'अर्थविज्ञाना'ने एकूण ९ भारतीय भाषांत ३१ लेख प्रकाशित केले. शिवाय एक नेपाळी आणि एक सिंहली असे दोन अन्य भाषांतील लेखही प्रकाशित केले. हे सर्व लेख देवनागरी लिपीत छापावेत, या सर्व लेखांच्या शेवटी त्यांचा सारांश इंग्रजीत द्यावा आणि सर्व इंग्रजी लेखांचा सारांश हिंदीत द्यावा असे संपादकीय धोरण असे.

या धोरणाचे पुष्कळांनी अभिनंदन केले, प्रशंसा केली. परंतु पुष्कळ प्रयत्न करूनही लेखकांचा प्रतिसाद अपुरा पडू लागला. वाचकांनाही देशी भाषांतील पुष्कळसे लेख दुर्बोध वाटू लागले. तत्त्वतःसुद्धा कोणत्याही वाचकास इंग्रजीशिवाय फक्त त्याच्या मातृभाषेतील लेखच वाचणे शक्य होते. खेरीज लिपीचा प्रश्न होताच. या सर्व अडचणी लक्षात घेऊन मार्च १९६६ पासून हा प्रयत्न नाइलाजाने सोडून द्यावा लागला. त्यानंतर काही काळ इंग्रजी लेखांचा हिंदी सारांश देणे चालू होते. दोन वर्षांनी तेही बंद झाले.

परंतु अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण देशी भाषांत झाले पाहिजे, त्याकरिता आग्रहपूर्वक प्रयत्न केला पाहिजे हा मूळ विचार पूर्णतः बाजूस ठेवणे शक्य नव्हते. म्हणून प्रस्तुत अंकाच्याद्वारा नव्याने प्रयत्न करीत आहोत. मागील अनुभव जमेस घेऊन एक संपूर्ण अंकच एका देशी भाषेत काढावा असा विचार करून आम्हांस त्यातल्या त्यात सुलभ म्हणून असा पहिला अंक मराठीत काढण्याचे ठरविले. परंतु त्याकरिताही लेखांची वाण पडू लागली. शेवटी नाइलाजाने उपलब्ध इंग्रजी लेखांचे मराठी भाषांतर करून लेखांची भरपाई करावयाची असे ठरविले. लेखांची निवड करताना ते शक्य तर एका विषयाशी संलग्न असावेत हे ओघानेच आले. प्रस्तुत अंकात भारतीय आर्थिक इतिहासाशी संलग्न असे पाच लेख अंतर्भूत केले आहेत. शिवाय पुस्तकपरीक्षणेही आहेत.

अंतर्भूत केलेल्या पांच लेखांपैकी फक्त एकच लेख मूळ लेखकाने मराठीत लिहिला आहे. बाकीचे चार लेख मूळ इंग्रजीवरून भाषांतरित केलेले आहेत. भाषांतराचे काम श्री श्रीपाद जोशी यांनी केले आहे. श्री श्रीपाद जोशी हे एक तज्ज्ञ भाषांतरकर्ते आहेत. भाषांतरकर्त्यांच्या मर्यादा संभाळून त्यांनी शक्य तेवढे सुलभ भाषांतर केले आहे. ते अधिक सुलभ व वाचनीय व्हावयाचे तर मूळ लेखकांनीच स्वभाषेत लेखन करण्याचा यत्न केला पाहिजे.

हा अंक विशेषांक म्हणून काढीत आहोत. ' अर्थविज्ञाना 'चे नियमित त्रैमासिक अंक नेहमीप्रमाणे प्रकाशित होतील. वाचकांस हा विशेषांक उपयुक्त वाटेल अशी आशा आहे. परंतु अर्थशास्त्रीय संशोधनात्मक लिखाण देशी भाषांत प्रकाशित करण्याचा हा मार्ग आम्ही गौण मानतो; आणि केवळ नाइलाजाने तो पत्करीत आहोत. याविषयी उपयुक्त प्रगती व्हावयाची तर मूळ लेखकांनीच आग्रहपूर्वक स्वभाषेत लिखाण केले पाहिजे. एका भारतीय देशी भाषेतून दुसऱ्या भारतीय देशी भाषेत तज्ज्ञांकडून भाषांतर करवून घेणे अपरिहार्य आहे. ते पुष्कळसे सुलभ व शक्यही आहे. परंतु मूळ इंग्रजीतून केवळ तज्ज्ञ भाषांतरकर्त्याने कोणत्याही भारतीय देशी भाषेत केलेले भाषांतर पूर्णतया समाधानकारक होणे संभवनीय नाही. म्हणूनच आम्ही हा मार्ग गौण मानतो. भारतीय अर्थशास्त्रज्ञांनी याविषयीची आपली जबाबदारी आता ओळखली पाहिजे. त्यांनी प्रतिसाद दिला तर ' अर्थविज्ञान ' सर्व भारतीय भाषांबाबत आपली जबाबदारी आनंदाने स्वीकारील.

# अनुक्रम


संपादकीय

१. आधुनिक भारतीय व्यवसायी वर्गाचे मूलस्रोत–
घ. रा. गाडगीळ, म. वि. नामजोशी — १–५४

२. मुगलकालीन अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही विकासाच्या संभाव्यता–
इरफान हबीब — ५५–१०२

३. अठराव्या शतकामध्ये महाराष्ट्रात असेही घडले असेल–
मा. द. आपटे — १०३–११५

४. ऐतिहासिक चौकटीमध्ये आढळून येणारी उद्यमशीलतेची प्रादेशिक प्रतिमानें : १८५७ सालापर्यंतचा पूर्व भारताचा प्रकरणाभ्यास–
अमलेंदु गुह — ११६–१५८

५. भारताचा आर्थिक इतिहास (१५२६–१९००) :
अभ्यासवाङमयसूचीविषयक निबंध–
नसीब बेंजामिन — १५९–१९०

६. पुस्तक परीक्षणे — १९१–२१३


---

टीप : या अंकातील क्र. ३ चा डॉ. मा. द. आपटे यांचा लेख मूळ मराठीत लिहिलेला असून इतर सर्व लिखाण मूळ इंग्रजीत आहे. त्याचा मराठी अनुवाद श्री श्रीपाद जोशी यांनी केला आहे.

मान

# या अंकातील अनुवादित लेखांची मुळातील शीर्षके व मूलस्रोत

क्र. १ *Origins of the Modern Indian Business class*—
An Interim Report
प्रकाशक : International Secretariat, Institute of Pacific Relations, 333 Sixth Avenue, New York, 14. N.Y. 1959. (चक्रमुद्रित).

क्र. २ '*Potentialities for Capitalistic development in the economy of Mughal India*'—'The Journal of Economic History,' Vol. 29, No. I, 1969.

क्र. ४ *Regional Models for Entrepreneurship in Historical Perspective :* A case study of Eastern India to 1857. (अप्रकाशित).

क्र. ५ *Economic History of India* (1526-1900),
A Bibliographic Essay. (अप्रकाशित).